केंद्र पुरस्कृत (Central Sector Scheme) "सिल्क समग्र-२" (ISDSI) योजनेंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांकरिता निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : सपवि-४००१२/२६/२०२५-DESKSERICULTURE-CMTD
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ३१ मार्च, २०२६.

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.प्रावियो-२०१८/प्र.क्र. ९०/रेशीम कक्ष, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४.
२) केंद्रीय रेशीम मंडळाचे पत्र क्र.CSB-३७/१/ CSs(SS-२) Maharashtra/२०२१-२६/ Vol.१, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३.
३) केंद्रीय रेशीम मंडळाचे पत्र क्र.CSB-३७/१/ CSs(SS-२) Maharashtra/२०२१-२६/ TS दिनांक १२ जुन,२०२५.
४) केंद्रीय रेशीम मंडळाचे पत्र क्र.CSB-३७/१/ CSs(SS-२) Maharashtra/२०२१-२६/ Vol.१, दिनांक १८ जुलै,२०२५.
५) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सपवि ४००१२/५/२०२५ DESKSERICULTURE CMTD, दिनांक १७ सप्टेंबर, २०२५.
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७ एप्रिल, २०२६.
७) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सपवि ४००१२/२६/२०२५ DESKSERICULTURE CMTD, दिनांक २७ मार्च, २०२६.
८) रेशीम संचालनालयाचे पत्र क्र.रेशीम/कार्या-९/कें.पु/सि.स.-२/ नि. मा/B.D.S/सन-२६/३६१, दि.२५.०३.२०२६.

प्रस्तावना : -

केंद्र पुरस्कृत (Central Sector Scheme) "सिल्क समग्र-२" (ISDSI) योजना सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यात राबविण्यास संदर्भाधिन दि.९ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्प समन्वय समितीने मंजूर केलेल्या १६३ लाभार्थ्यांच्या प्रस्तावानुसार सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात उपलब्ध तरतूदीतून केंद्र हिस्सा ₹ १६.२३ लक्ष व त्यास पुरक राज्य हिस्सा ₹ ८.११ लक्ष इतका निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याची विनंती संदर्भ क्र.८ अन्वये रेशीम संचालनालयाने केली आहे. त्यानुषंगाने सर्वसाधारण प्रवर्गातील १६३ लाभार्थ्यांच्या प्रस्तावाकरिता केंद्र हिस्सा ₹ १६.२३ लक्ष व त्यास पूरक राज्य हिस्सा ₹ ८.११ लक्ष असा एकूण ₹ २४.३४ लक्ष इतका निधी वित्त विभागाने उपलब्ध करून दिलेल्या निधीतून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :

केंद्र पुरस्कृत (Central Sector Scheme) "सिल्क समग्र-२" (ISDSI) अंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गातील १६३ लाभार्थ्यांच्या प्रस्तावाकरिता केंद्र हिस्सा ₹ १६.२३ लक्ष व त्यास पूरक राज्य हिस्सा ₹ ८.११ लक्ष असा एकूण ₹ २४.३४ लक्ष इतका निधी इतका निधी पुढील तक्त्यात नमूद केलेल्या बाबींसाठी वितरीत व खर्च करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे :-

(रुपये लाखात)

अ. क्र.	बाब	युनीट कॉस्ट	हिस्साचे प्रमाणे (केंद्र: राज्य : लाभार्थी)	निधी मागणी लाभार्थी संख्या	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	एकूण रक्कम
१.	किटक संगोपनगृह बांधकाम मॉडेल -I	४.५०	५०:२५:२५	०१	२.२५	१.१२५	३.३७५०
२	किटक संगोपन साहित्य (२ एकर)	०.७५	५०:२५:२५	०२	०.७५	०.३७५	१.१२५
३	निर्जतुकीकरण साहित्य पुरवठा (२ एकर)	०.०५	५०:२५:२५	२०	०.५०	०.२५	०.७५
४	सिचन संच (२ एकर)	१.००	५०:२५:२५	०४	२.००	१.००	३.००
५ .	किटक संगोपन साहित्य (१ एकर)	०.५०	५०:२५:२५	०२	०.५०	०.२५	०.७५
६	निर्जतुकीकरण साहित्य पुरवठा (१ एकर)	०.०५	५०:२५:२५	१०९	२.७२५	१.३६	४.०८७५
७.	सिचन संच (१ एकर)	०.६०	५०:२५:२५	२५	७.५०	३.७५	११.२५
	एकूण			**१६३**	**१६.२३**	**८.११**	**२४.३४**

२. सदर निधी केंद्र पुरस्कृत (Central Sector Scheme) "सिल्क समग्र-२" (ISDSI) सुधारीत मानकांना दिलेल्या प्रशासकीय मंजूरीनुसार व त्या संदर्भातील मार्गदर्शक सुचनांनुसार संचालक (रेशीम) यांनी खर्च करावा. तसेच, ज्या योजनांसाठी व बाबींसाठी केंद्र शासनाने निधी उपलब्ध केला आहे, त्याच बाबींवर सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. वितरीत करण्यात आलेल्या निधीतून झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्रीय रेशीम मंडळ व शासनास विहीत मुदतीत सादर करण्याची कार्यवाही संचालक (रेशीम) यांनी करावी.

३. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षामधील उपलब्ध तरतूदीमधून मागील वर्षातील निधी खर्च करतांना, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तीय नियम, प्रचलित अटी व शर्तीचे तसेच, नियोजन विभाग व वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अटीच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. सदर योजनेंतर्गत अनुदान देताना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नानाजी देशमुख कृषि संजिवनी योजना (पोक्रा) व इतर शासकीय योजनेंतर्गत लाभ दिला नसल्याची खात्री करुनच पात्र लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची कार्यवाही संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर यांनी करावी.

५. सदर योजनेचा लाभ डीबीटी प्रणालीच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे लाभार्थ्यांना अदा करण्याची कार्यवाही करावी.

६. केंद्र शासनाने कृषी व कृषी पुरक व्यवसायाकरिता देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्य व अनुदानांकरिता "ॲग्रीस्टॅक" या प्रणालीच्या माध्यमातून फार्मर्स आयडी (Farmers Id) काढणे अनिवार्य केले आहे. त्यामुळे केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-२ या योजनेचा लाभ देताना फार्मर्स आयडी (Farmers Id) असणाऱ्या शेतकऱ्यांनाच अनुदान अदा/ वितरीत होईल याची दक्षता संचालक (रेशीम) यांनी घ्यावी.

७. साहित्य पुरवठा कार्यक्रमांतर्गत खरेदी करण्यात आलेल्या अनुज्ञेय साहित्याचे केंद्रीय रेशीम मंडळ अथवा शासनमान्य संस्थेकडील अधिकृत विक्रेताकडील टॅक्स बील (जीएसटी सह), रक्कम अदा केल्याची पावती तसेच, प्रत्यक्ष साहित्य खरेदी केल्याची स्थळ पाहणी करून व फोटोग्रॉफस घेऊनच अनुदान अदा करण्याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

८. कोष पश्चात प्रक्रीयेंर्गत पाणी पुनर्वापर संयंत्र प्रकल्प (Water Recycling Plant) उभारणीकरिता केंद्रीय रेशीम मंडळाच्या मार्गदर्शक सुचना विचारात घेवून सदर प्रकल्पाच्या युनीट कॉस्टनुसार लाभार्थ्याच्या हिश्याची २५ टक्के रक्कम ESCROW खात्यामध्ये जमा करुन व विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करुन प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक यंत्रसामुग्रीची खरेदी करणे बंधनकारक राहील. प्रकल्पाच्या मंजूर मानकापेक्षा अतिरीक्त खर्च लाभार्थ्याने स्वनिधीतून उपलब्ध करुन प्रकल्प कार्यान्वित करणे आवश्यक राहील. सदर प्रकल्प उभारणीकरिता संबंधित विभागाच्या आवश्यक परवानग्या प्राप्त करून घेणे, पाणी गुणवत्ता पूर्व व पश्चात चाचणी प्रमाणपत्र, कामकाज पूर्णत्वाचा दाखला इत्यादी बाबी तपासून लाभार्थ्यांना अनुदान देण्याची कार्यवाही संचालक (रेशीम) यांनी करावी.

९. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी लाभ घेतलेल्या बाबीअंतर्गत उभारण्यात आलेल्या मालमत्तेचे जीओ टॅगीग करणे बंधनकारक राहील.

१०. सदर योजनेंखाली केंद्र हिश्श्यासाठी ₹१६.२३ लक्ष (अक्षरी रुपये सोळा लक्ष तेवीस हजार फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यात येत असून उक्त खर्च हा "मागणी क्रमांक -व्ही-२, २८५१ ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११० संमिश्र ग्रामोद्योग व लघुउ्द्योग आणि सहकारी संस्था (०२) विविध सहकारी संस्थांना सहाय्य, (०२) (४९) रेशीम उद्योगाचा विकास केंद्र पुरस्कृत(केंद्र हिस्सा) (कार्यक्रम) (२८५१ १२६९) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) अंतर्गत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

तसेच, राज्य हिश्श्यासाठी ₹८.११ लक्ष (अक्षरी रुपये आठ लक्ष एकरा हजार फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यात येत असून उक्त खर्च हा "मागणी क्र. व्ही-२, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग,११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुउ्द्योग आणि सहकारी संस्था (०२) विविध सहकारी संस्थांना सहाय्य,(०२)(४५) रेशीम उत्पादक,खादी ग्रामोद्योग व ग्रामोद्योग विकास (कार्यक्रम) (२८५१ १२०४) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) अंतर्गत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

११. उक्त निधी खर्च करण्यासाठी नियंत्रण अधिकारी संचालक (रेशीम), नागपूर (V-०००३) यांचे अधिनस्थ BDS प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आली आहे. संचालक (रेशीम) यांनी ही रक्कम संबंधित आहरण व संवितरण अधिका-याना वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

१२. सदर शासन निर्णयान्वये वितरित करण्यात येणारा निधी हा वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.२००/२०२६/व्यय-२, दि.१८.०३.२०२६ अन्वये उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीमधून करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०३३११७११२३११०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PAWAR TUSHAR PITAMBAR
Date: 2026.03.31 17:12:11 +05'30'

(डॉ.तुषार पवार)

उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
२) प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
३) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
४) अ.मु.स. (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सदस्य-सचिव, केंद्रीय रेशीम मंडळ, बंगळूरु.
८) उप सचिव (अर्थसंकल्प) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई .
९) संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर.
१०) संबधित जिल्हा कोषागार अधिकारी.
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२) नियोजन विभाग (का-१४३१), मंत्रालय, मुंबई.
१३) वित्त विभाग (व्यय-२/व्यय-१४/अर्थसंकल्प-१३/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
१४) सर्व प्रादेशिक रेशीम कार्यालये.
१५) सर्व जिल्हा रेशीम कार्यालये.
१६) अवर सचिव (का-१७ स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) निवड नस्ती (रेशीम कक्ष).